**प्रेसनोट दिनांक ०८/०३/२०१९**
**खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**<u>१७ वर्षीय घरातुन गेलेल्या मिसींग मुलाचा तात्काळ शोध घेऊन त्यास नातेवाईकांचे ताब्यात सुखरुप परत</u>**

दिनांक ०७/०३/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास इसम नामे संतोष खिलारे रा. १५७६ शुक्रवार पेठ, पुणे यांनी खडक पोलीस ठाणेस समक्ष येऊन कळविले की, त्यांचा मुलगा यश खिलारे, वय १७ वर्ष रा.सदर हा दिनांक ०६/०३/२०१९ रोजी रात्रौ १०.०० वा. चे सुमारास बाहेर खेळायला जातो असे सांगुन घरातुन गेला असुन, तो परत घरी आला नसल्याचे व त्याचा त्यांनी तसेच आजी, आजोबा यांनी त्यांचा रात्रभर शोध घेतला असता तो मिळुन आलेला नाही व सदर मुलाचा मोबाईल फोन बंद असल्याचे सांगीतले.

खडक पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर असलेले महिला पोलीस उप निरिक्षक कल्याणी पाडोळे, पोशि ९८६८ योगेश जाधव, पोशि महावीर दावणे यांनी मिसींग मुलाचे मोबाईल फोनचा तांत्रीकदृष्टया तपास करुन, सदर मुलगा - यश खिलारे, वय १७ याचा अवघ्या ३० मिनिटात शोध घेऊन, त्यास ताब्यात घेऊन, त्यास त्याचे वडीलांचे ताब्यात सुखरुप परत करण्यात आले आहे.

ता. ०८/०३/२०१९

**( राजेन्द्र मोकाशी )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

